महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/३०७/२०२५-२६ दिनांक :- २३/०२/२०२६

# परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (संयुक्त गट ब व क) परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करीता तिसरी प्रतिक्षा यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबिण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (संयुक्त गट ब व क) परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थ्यांची विस्तारित यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.२३/०१/२०२६ रोजी प्रसिध्द करून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना संबंधित प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता दि.१०/०२/२०२६ रोजी पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. तसेच जे विद्यार्थी दि.१०/०२/२०२६ रोजी पर्यंत प्रशिक्षण संस्थेत रुजू होणार नाही अश्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करून पुढील प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल असे देखील कळविण्यात आले होते.

त्यानुसार संबंधित प्रशिक्षण संस्थेमार्फत प्राप्त अहवालानुसार निवड व प्रतिक्षा तसेच विस्तारित यादीतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रकिया पूर्ण केलेली नाही अश्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात आलेले असून रिक्त असलेल्या जागांकरिता पुढील प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांची निवड करून सदर प्रशिक्षणाकरिता तिसरी प्रतिक्षा यादी **(प्रवर्ग व प्रशिक्षण संस्थानिहाय)** महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना संबंधित प्रशिक्षण संस्थेत दि.२८/०२/२०२६ रोजी पर्यंत रुजू होण्याकरिता सूचना निर्गमित करण्यात येत आहे. **जे विद्यार्थी दि.२८/०२/२०२६ रोजी पर्यंत प्रशिक्षण संस्थेत रुजू होणार नाही अश्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करून पुढील प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.** सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**